पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१,
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय
पत्ता- प्रिमियर कंपनीच्या शेजारी,
जुना पुणे-मुंबई रस्ता, चिंचवड, पुणे १९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट**

दिनांक २१/०६/२०२३

## महीलांविषयी अपशब्द वापरणारे तरुणास बेदम मारहाण करणारे आरोपींना ०२ तासामध्ये अटक महाळुंगे व चाकण पोलीसांची संयुक्तिक कामगिरी

---

मौजे खालुंब्रे, ता-खेड जि-पुणे येथील कोकाटे वडापाव दुकानात काम करणारा कामगार नामे संजय सुरेश मिश्रा, वय २३ वर्ष रा-वाघजाईनगर, खराबवाडी ता-खेड जि-पुणे हा काल दिनांक २०/०६/२०२३ रोजी सायंकाळी ०७:४५ वा चे सुमारास कामावरुन सुट्टी झालेवर खालुंब्रे येथुन रिक्षामध्ये बसुन घराकडे जात असताना रिक्षातील तरुणांशी झालेल्या वादामध्ये रिक्षातील तरुणांनी त्यास जबरदस्तीने रिक्षातुन बिरदवडी फाटा मार्गे वाकी खुर्द गावचे हद्दीतील डायमंड हॉटेलजवळ नेवुन तेथे इतर साथीदार मित्रांना बोलावुन घेतले. व फिर्यादी संजय मिश्रा यास शिवीगाळ करत जबर मारहाण करुन त्याचेकडील २०,०००/रु रोख व १७,०००/रु चा मोबाईल फोन जबरदस्तीने काढुन घेतल्याचे फिर्यादीवरुन महाळुंगे एम.आय.डी.सी.पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नंबर ३४७/२०२३, भा.द.वि.कलम ३६४ (अ), ३९७, २९५(अ), ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हाचे गांभीर्य ओळखुन लागलीच परिमंडळ-१ चे पोलीस उप-आयुक्त श्री विवेक पाटील, चाकण विभागचे सहा.पोलीस आयुक्त श्री.राजेंद्रसिंह गौर यांनी गुन्हयाचे तपास संदर्भाने सुचना मार्गदर्शन केले. त्यानुसार महाळुंगे पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंतराव बाबर, गुन्हे शाखेचे युनिट ४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर अवताडे, दिघी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मच्छिंद्र पंडीत, पिंपरी पोलीस स्टेशनचे अनिल देवडे, चाकण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव शिनगारे यांनी लागलीच पोलीस स्टाफचे मदतीने आरोपींचा शोध घेवुन मारहाण करणारे सर्व आरोपींना ०२ तासाचे आता ताब्यात घेवुन तपास करता फिर्याद हे रिक्षात बसुन जात असताना महिलांविषयी अपशब्द वापरत असल्याने त्यास आरोपींनी समजावुन सांगितल्याचे कारणावरुन फिर्यादी व आरोपींचेमध्ये वाद निर्माण झाल्यावर फिर्यादीस मारहाण केल्याची कबुली दिली आहे. सदर गुन्हयातील ५ आरोपींना अटक केली असुन ०१ विधीसंघर्षीत बालकास ताब्यात घेण्यात आले आहे.

**अटक आरोपींची नावे :-**

१) **वसीम नवीद बेग, वय २४ वर्ष,** राहणार बीड वस्ती, चाकण, ता-खेड जि पुणे
२) **मयुर भगवान गालफाडे, वय २३ वर्ष** राहणार बीड वस्ती, चाकण, ता खेड जि पुणे
३) **लक्ष्मण राम जोगदंड, वय २२ वर्ष,** राहणार बीडवस्ती, चाकण ता खेड जि पुणे,
४) **करण पांडुरंग सुरवसे, वय २० वर्ष** राहणार बीड वस्ती, चाकण ता खेड जि पुणे
५) **रोहण अरुण बनसोडे, वय २१ वर्ष** राहणार बीड वस्ती,चाकण, ता खेड जि पुणे

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त **श्री.विनयकुमार चौबे,** मा.अपर पोलीस आयुक्त **श्री.वसंत परदेशी,** मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१ **श्री विवेक पाटील,** सहाय्यक पोलीस आयुक्त, चाकण विभाग **श्री.राजेंद्रसिंह गौर,** यांचे सुचना व मार्गदर्शनानुसार महाळुंगे पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक **श्री वसंतराव बाबर** व पोलीस अंमलदार, तसेच चाकण पोलीस स्टेशनचे **श्री वैभव शिनगारे** व पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

( विवेक पाटील )
पोलीस उप आयुक्त,परिमंडळ १
पिंपरी चिंचवड शहर